# परळी प्रकल्पातील संच क्र.६ चे राष्ट्रार्पण व संच क्र.७ चे बॉयलर प्रदिपन मा. उर्जामंत्री यांचे शुभहस्ते संपन्न.

महाराष्ट्रातील विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन वीज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न चालू असून सरकारने या संदर्भात सकारात्मक व धोरणात्मक पाऊल उचलले असल्याने २०१२ पर्यंत महाराष्ट्र राज्य भारनियमन मुक्त होईल व त्यात परळी वीज निर्मिती केंद्राचा महत्वाचा सहभाग असेल असा विश्वास राज्याचे ऊर्जा मंत्री ना. सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्र. ६ ऊर्जामंत्री मा. ना. सुनिल तटकरे व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्राला अर्पण करण्यात आला. याच कार्यक्रमात संच क्र. ७ चे मंत्री महोदयांच्या हस्ते बॉयलर प्रदिपन करण्यात येवून संच क्र.८ च्या संचाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. अनुक्रमे २५० मेगावॅटचे हे तीन प्रकल्प नविन परळी औष्णिक विद्युत केंद्रात स्थापित होत आहेत. या संयुक्त कार्यक्रमास वीज निर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक मा. सुब्रत रथो,महावितरणचे मा.अजय मेहता, आ. प्रकाशदादा सोळंके, आ.सौ. उषाताई दराडे, यांच्यासह संगमच्या सरपंच सौ. ज्योती कोकाटे, वडगाव दादहरीचे सरपंच शिवाजी घायाळ, दाउतपूरचे सरपंच वैजनाथ बीडगर,कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात पुढे बोलतांना मा.ऊर्जा मंत्री सुनिल तटकरे पुढे म्हणाले की, १९८५ पर्यंत महाराष्ट्र वीज निर्मिती मध्ये स्वयंपुर्ण होते, राज्यातील विजेची गरज भागवून इतर राज्यांना वीज पुरविण्याचे काम महाराष्ट्राने केले .

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील नव्या तंत्रज्ञानामुळे प्रदुषण आता कमी होत आहे. तथापि आणखी प्रदुषण कमी व्हावे याकरिता स्वतंत्र व्यवस्था निर्माण करुन योग्य ती खबरदारी घेतली जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. परळी औष्णिक विद्युत केंद्रातील प्रकल्प ग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही काही निर्णय घेतल्याचे ते म्हणाले. आय.टी.आय. झालेल्या प्रकल्प ग्रस्तांना टप्याटप्याने सामावून घेत असून अन्य उमेदवारांना प्रशिक्षण आमच्याकडून दिले जाईल व त्यांनाही प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरीत सामावून घेतले जाईल असेही ना.तटकरे म्हणाले. दरम्यान प्रकल्पासाठी भुसंपादन करतांना लवकरच आम्ही रेडी रेकनर कायदेशिर करुन घेऊन मोबदला वाढविण्यासाठी निर्णय घेवू, परळी शहर व परिसरातील नागरिकांचे वीज निर्मिती प्रकल्पा बाबत सकारात्मक धोरण आहे याचा आपल्याला आनंद वाटतो, असेही ते म्हणाले.

या प्रसंगी आ. प्रकाशदादा सोळंके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक सुब्रथो रथो यांनी प्रास्ताविक केले. संच क्र. ८ नंतर क्षमता १४४० मेगावॅट एवढी होणार असून परळीतील विद्युत केंद्र, महाऔष्णिक विद्युत केंद्र होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सुमारे १३७५ कोटी रुपये खर्च करुन संच क्र ८ उभारला जात असून नियोजित वेळेत अर्थातच २०१२ ला या प्रकल्पातून वीज निर्मिती सुरु होईल असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यातील वीज निर्मिती परळी औष्णिक विद्युत केंद्राची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. तत्पुर्वी प्लँट मध्ये जावून ऊर्जा मंत्र्यांच्या हस्ते संच क्र ७ चा बॉयलर प्रदिपन करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दुरदर्शनच्या निवेदिका सौ. कल्पना साठे यांनी केले. कार्यक्रमास परळी शहर, बीड व आंबेजोगाई परिसरातून बहुसंख्य नागरिक व पत्रकार बंधू उपस्थित होते.

❖❖❖

## निरोप — आम्ही आपले कृतज्ञ आहोत.

१) सु.ला. गिरडकर (वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ)
२) सा.अ. लांडे (प्रभारक श्रेणी-१)
३) शे.पु. राउत (कारागीर - अ) ४) मा.द. बुजाडे (कारागीर - अ) ५) ध.न. बिरखेडे (कारागीर - अ),६) ल.मा. भांडारकर (उच्चस्तर लिपीक - लेखा),७) प्र.रा. गावंडे (कारागीर - ब), ८) ह.सं. मनघटे (कारागीर - ब),९) झो.धों. हाडके (कारागीर - क),१०) बि.दौ. बोलधने (कारागीर - ड),११) रा.न. महाजन (कारागीर - ड),१२) रा.गो. फाळके (अर्धकुशल कारागीर), १३) ध.बा. सावरकर (अर्धकुशल कारागीर),१४) श्रा.द. कैकाडे (भांडार मदतनीस),१५) ग्रे.रे. फोर्ड (पहारेकरी),

**वरील सर्व अधिकारी / कर्मचारी कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातून निवृत्त होत आहेत.**

### जुलै महिन्यातील निवृत्त अधिकारी / कर्मचारी( मुख्यालय, मुंबई)

१) श्री. वाय.डी. थोरात (सहाय्यक लेखापाल),२) श्री. एस.आर. नाईक (मुख्य लिपीक),३) श्री. ए.ई. गायकवाड (अप्पर विभागीय लिपीक)

### ऑगस्ट महिन्यातील निवृत्त अधिकारी / कर्मचारी (मुख्यालय, मुंबई)

१) श्री. ए.एस. देसाई (उप-कार्यकारी अभियंता - जनरेशन),२) श्री. आर.एम. नाचेगिरीवर (उप-कार्यकारी अभियंता - सिविल),३) श्री. व्ही.एस. भिरूड (उप-आस्थापना अधिकारी),४) श्री. व्ही.जे. शिंदे (लेखा अधिकारी)